Vol 6 Issue 5 June 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 5 | June - 2016

Indian Streams Research Journal

# औंध संस्थानातील राजकीय विकासाचे प्रतिमाण

*प्राचार्य डॉ.एस. डी. पवार*
*बाळासाहेब देसाई कॉलेज,पाटण , जि.सातारा.*



***प्रस्तावना :–***

औंध हे दक्षिण महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील एक संस्थान होते. २० व्या शतकातील औंध संस्थानचे प्रमुख भवानराव उर्फ बाळसाहेब पंतप्रतिनिधी पुरोगामी विचारांचे होते. बाळासाहेब पंतप्रतिनिधी ४ नोव्हेंबर १९०६ मध्ये सत्तेवर आले. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या पुरोगामी धोरणामुळे औंध परिसराचा राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास झाला. लोकमतानुवर्ती राज्यपध्दती ही औंधने राष्ट्रास दिलेली प्रत्यक्ष प्रायोगिक देणगी आहे. महात्मा गांधीच्या ग्रामोद्वार, पंचायत राज, स्वदेशी, साक्षरता आदी राजकीय विचारांचा प्रभाव औंधमधील सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या प्रयोगावर पडलेला दिसून येतो. औंधमधील लोकसत्ताक राजवटीचा प्रयोग एक क्रांतीकारी घटना होती. या क्रांतीची प्रणेती जनता नसून खुद्द संस्थानिक होते. आजचा समाज भौतिक यशाची थोरवी मानणारा असला तरी औंधमधील बहात्तर गावातून साकार झालेल्या ग्रामस्वराज्याच्या प्रयोगाने समकालीन समाजजीवनावर एक उदात्त राजकीय संस्कार घडविला गेला हे नाकरता येत नाही. राजकीय विकासाच्या निकषांचा विचार करता, बाळासाहेब पंपप्रतिनिधी यांनी केलेले कार्य राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे आहे. ग्रामस्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव, ग्रामसभा आदी राजकीय योजनांची बिजे, औंध राज्यघटनेच्या उद्देशात दिसून येतात. अर्थात सुमारे शंभर वर्षापुर्वी स्वातंत्र्यपुर्व काळातच आजच्या भारतीय लोकशाहीच्या प्रतिमाणाच्या विचारांची स्वप्ने एक राजा केवळ बघत नव्हता तर त्यासाठी आपल्या राज्यसत्तेचा, मोठेपणाचा त्याग करून सर्व सत्ता लोकांच्या हातात देऊन ती प्रत्यक्षात उतरवण्याचा खराखुरा प्रयत्न करत होता.प्रस्तुत शोधनिंबधात बाळासाहेबांनी राबविलेल्या राजकीय विकासाच्या प्रतिमानाचा टीकात्मक आढावा घेतला आहे. त्यांनी त्यासाठी कोणकोणते प्रयत्न उपाययोजना केल्या. त्याचा अभ्यास ऐतिहासिक व राजकीय दृष्टीकोनातून विश्लेषणात्मक पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.यासाठी संस्थान कालीन कागदपत्रे, जाहिरनामे, गॅझेट तत्कालीन वर्तमानपत्रे आदी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे शोधनिबंधांची मांडणी केली आहे.

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी केलेल्या राजकीय विकासाचे स्वरूपः– बाळासाहेब पंतप्रनिधी यांनी आपल्या कारकिर्दीत सत्तेवर आल्यापासून औंध संस्थानात राजकीय, सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक क्षेत्रात विकासासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न केले. प्रामुख्याने लोकशाही प्रयोगाची अमंलबजावणी करून राजकीय विकासाच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा टप्पा त्यांनी पूर्ण केला होता. राजकीय विकासाच्या प्रक्रियेत समाज व राजकीय व्यवस्था अधिक आधुनिक असणे महत्वाचे असते. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी परंपरागत सरंजामशाही राजकीय व्यवस्था दूर करून आधुनिक काळातील सर्वात लोकप्रिय व्यवस्था दूर करून आधुनिक काळातील सर्वात लोकप्रिय शासन प्रकार असणा–या लोकशाही शासन पध्दतीचा, विचारांचा केवळ आग्रह न धरता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. हंटिंग्टन यांच्या मते, राजकीय विकासाच्या प्रक्रियेमध्ये समाजाची वाटचाल राजकीय विकासाच्या दिशने होईल की राजकीय –हासाच्या, हे वाढत्या राजकीय सहभागाला सुसंगत अशा संस्थाची निर्मिती होण्यावर अवलंबून असते समाजात विविध शक्ती असतात. त्यांना नियंत्रित ठेवण्यासाठी राजकीय संस्था आवश्यक असतात. कायदेमंडळ, राज्यघटना, न्यायव्यवस्था, प्रशासन, निवडणूक हे घटक खूप मोठया प्रमाणावर राजकीय विकासात महत्वाची भूमिका बजावतात. सर्वच

समाजामध्ये राजकीय, श्रेष्ठजन राजकीय विकासाला अनुकूल असतात असे नव्हे. धर्मगुरू, सरंजामदार, राजे अशा परंपरागत श्रेष्ठीजनांचा बहुध राजकीय विकासाला आणि आधुनिकतेला विरोधच असतो.[१] मात्र बाळासाहेबांनी नेमके याउलट केले. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सामान्य लोकांना लोकशाही हक्क प्रदान केले. औंध ग्रामराज्यासाठी राज्यघटना निर्माण करून ग्रामपंचायत, पंचायत समिती, कायदेमंडळ अशी त्रिस्तरीय राजकीय व्यवस्था निर्माण केली. स्वस्त व जलद न्याय देण्याच देणारी न्यायव्यवस्था निर्माण करून जनतेला आपल्या अधिकाराबाबत अश्वस्त केले.

### सत्तेच्या विकेंद्रीकरणाची पार्श्वभूमी :—

बाळासाहेब पंतप्रतिनीधी सन १९०९ मध्ये सत्तेवर आले सत्तेवर आल्याबरोबर त्यांनी अनेक राजकीय , सामाजिक सुधारनाना सुरवात केली.सन १९१६ मध्ये गामपंचायत स्थापनेचा पहिला कायदा केला. तसेच विकेद्रीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा सन १९१९ चा कायदा केला या कायदयाने ग्रामपंचायतीचा कारभार अधिक विकेंद्रीत केला. न्यायसभा,अरोगयसभा ,उदयोगसभा, शिक्षणसभा, सार्वजनिक कार्यसभा आदि सभा, समित्यांची निर्मिती करुन सत्तेचे अधिक सुक्ष्म विकेंद्रीकरण केले.लोकांचा राजकीय सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने हा कायदा अत्यंत महत्वाचा होता राजकीय विकासाच्या प्रक्रियेत लोकांचा राजकीय सहभाग किती व कसा आहे हे महत्वाचे असते.सन १९३९ च्या राज्यघटना कायद्याने औंधमधील या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेला घटनात्मक स्थान प्राप्त झाले.[२]ही राज्यघटना महात्मा गांधी यांच्याशी विचार विनिमयकरुन तयार केली होती.

### 1939 चा राजघटना कायदा :—

औंध ग्रामराज्याची घटना गांधी विचाराने प्रभावित होती. राज्यघटनेच्या सरनाम्यातच अहिंसा व सार्वजनिक नितीमत्तेचे उल्लेख आढळतो [३] सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण , साक्षरता, खादी उद्योगांना चालना , सुत काढणे, मोफत शिक्षण आदी गांधी विचारांवर आधारलेले हे ग्रामराज्य होते.राजकीय विकासाच्या प्रक्रियेत व्यक्तिला विकाससाठी देण्यात येणारे हक्क महत्वाचे असतात.लोकशाही शासनात व्यक्ती हक्कांना खूप महत्व असते.औंध राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीला जात,भाषा, धर्म हा भेद न ठेवता समानतेने हक्क दिले होते.यामध्ये प्रामुख्याने भाषणस्वातंत्र, संघटना स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आदी हक्क दिले होते. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, कामाचा हक्क, तसेच राज्यघटनेच्या अंमलबजावणीच्या सुरवातीला साक्षर लोकांनाच मतदानाचा हक्क दिला होता. दुस–या दुरूतीनंतर तो सार्वत्रिक करण्यात आला होता. या कायदयाने संस्थानातील सर्व अर्थात बहात्तर गावात कायदयोन ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली होती. कल्याणकारी कार्यासाठी ग्रामपंचायतीने अर्धा महसूल वापरण्याची घटनात्मक तरतूद केलेली होती. विकेंद्रीकरणाच्या दुसरा स्तर राज्यघटना कायदा कलम (५) नुसार तालुका समितीचा होता ७२ गावांचे ५ गटात विभागणी करून आटपाडी, खरसुंडी, कुंडल, गुणदाळ, व औंध या ५ तालुका समित्या गठित करण्यात आल्या होत्या.[४]

### स्वतंत्र न्यायपदधती स्वस्त व जलद न्यायाचा हक्क :—

स्वस्त व जलद न्यायाचा हक्क औंधमधील न्यायदान पध्दतीचे महत्वाचे वैशिष्टय होते. गावपातळीवरील तंटे–बखेडे गावातच मिटविले जावेत, प्रजेचा पैसा व वेळ यांचा अपव्यय होऊ नये, हा उद्‍देश यापाठीमागे असलेला दिसतो. प्राचीन भारतीय न्यायाच्या संकल्पनेचा मोठा प्रभाव यावर दिसून येतो. शंभर रूपयापर्यंत दिवाणी दाव्यांचा निकाल व इंडियन पिनल कोड २७७, २१९, ३२३, ३४१, ३५२, ४२६, ५०४, ५१० कलमाखालील चौकशीचा अधिकार ग्रामपंचायतीना दिला होता. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी स्वतःचा न्याय देण्याचा अधिकार हायकोर्टाकडे सुपूर्द केला होता. बहाहत्तर गावांच्या न्यायसभा व हायकोर्ट यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक सरन्यायाधीश नियुक्त केले जात. न्याय व्यवस्थेचे ते प्रमुख होते. सरन्यायधिशांच्या अधिकाराखली पाच हजार रूपयेंच्या वरील किमंतीचे दावे दाखल करता येत असत. अकार्यक्षमता, गैरकारभार आदी कारणांमुळे न्यायसभेचे, अधिकार काढून घेण्याचा अधिकार सरन्यायाधिशांना होता. पंचांच्या गैरवर्तनामुळे १९३९–१९४४ या कालखंडात सुमारे आठ न्यायसभाचे अधिकार काढून घेतल्याचे दिसून येते.[५]

औंध ग्रामराज्य प्रतिमाणाची फलश्रुती व राजकीय विकासात भर टाकणारे घटकः– स्वातंत्रयपूर्व काळात वासाहतीक व्यवस्था असताना देखिल राजकीय विकासाच्या दृष्टीने लोकशाहीची दिशा दाखविणारा मार्ग असल्याचे दिसून येते. सत्तेचे विकेंद्रीकरण, प्रत्यावहन, लोकांना मूलभूत हक्क प्रदानता. मुक्त कैदी वसाहत आदी नाविन्यपूर्ण वैशिष्टयांमुळे भारतातील इतर संस्थांनापेक्षा औंध व बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे वेगळेपण दिसून येते. तत्कालिन सामाजिक, राजकीय परिस्थिती अत्यंत औदासिन्ययुक्त होती. बाळासाहेबांच्या उदार राजकीय धोरणांमुळे, धर्मभोळेपणा, अंधवृत्ती, सामाजिक हुकूमशाही, कुप्रथा–परंपरा या जंजाळात गुरफटलेला सामान्य माणूस या घटनेमुळे जागृत झाला. आपल्या न्याय–हक्कासाठी संघर्ष करू लागल, हे सन १९३८ च्या आटपाडी येथील शेतक–याच्या मोर्चावरून लक्षात येते. कारण इतर काही संस्थानात आंदोलनाचे राजकीय तंत्राचा आधार घेऊन लढणे अतिशय कठीण होते.

औंधचे ग्रामराज्य 'पोलिसीस्टेट' पासन खूप दूर होते. अर्थात बळाचा वापर करावाच लागला तरी लोकांच्यात आपल्या गावाविषयी स्वराज्य व प्रेमाची भावना निर्माण झाली. स्वच्छता राखणे आपले कर्तव्य समजले जावू लागले. स्वच्छतेमुळे गावात स्वास्थ्य निर्माण झाले त्याचा परिणाम म्हणून स्वतःआर्थिक झळ सोसून, अंगमेहनतीने, श्रमदानाने लोकोपयोगी कामे करण्यास अनेक ग्रामपंचायती, लोक पुढे आले सन १९४० ते १९४६ या दरम्यानच्या कालखंडात त्याकाळात ३३,४५० रूपयांची कामे लोकांनी श्रमदानाने पूर्ण केली त्याचा परिणाम असा झाला की, ब्रिटीश प्रदेशातील लोक औंध संस्थानातील गावामधून राहायला येवू लागले. [६]बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी केलेल्या राजकीय विकासाच्या प्रक्रियेत शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक घटकांनी महत्वाची भर

घातली.

### शैक्षणिक विकास :–

राजकीय विकासासाठी महत्वाची पूर्व अट म्हणजे जनतेमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे ही असते. त्यासाठी त्यांनी शिक्षण विकासाचे महत्वपूर्ण कार्य केले. औंध संस्थानात त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. गरजू विद्यार्थ्यांची औंधमध्ये राहण्याची सोय केली. [७] मॉडेल क्लास ही नवी संकल्पना विकसित केली. तीन चार वर्गांची मुले घेऊन एकाच शिक्षकाने सोयीचे वेळापत्रक करून कसे शिकवावे याचे प्रशिक्षणही देण्यात येवू लागले. ड्रॉईग, सुतारकाम, लोहारकाम, रंगकाम, विणकाम, मातीकाम आदी तांत्रिक शिक्षणासाठी सन १९३२ मध्ये 'त्र्यबंक कलाभवन' या तंत्रशिक्षण शाखेची स्थापना केली. सन १९०९ मध्ये केवळ चौथी इयत्ता पर्यतच शिक्षणाची सोय' होती. सन १९०९ मध्ये ३१ शाळा स्थापन झाल्या. १९१९ मध्ये ही संस्था ५९ वर गेली. १९३५ मध्ये ही संस्था ८५ एवढी झाली. ग.दि.माडगुळकर, शंतनुराव किर्लोस्कर, सानेगुरूजी आदीचे शिक्षण औंधमध्येच झाले.

### आर्थिक विकास :–

संस्थानातील शेती, औद्योगी विकासासाठी बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी मोठे प्रयत्न केले. गरीब शेतक–यांना तगईच्या माध्यमातून सन १९३३–३४ अखेर सुमारे १,१७,५८९ एवढे भांडवल शेतक–यांना दिले. [८] पाच हजार एकर जमीन लागवडीखाली आणली. सुधारीत बी–बीयाणे, माती परीक्षण, कृषीपदर्शन, तसेच शेतक–यांना आधुनिक कृषिविषयक माहितीसाठी 'शेती व शेतकरी' हे मासिक सुरू केले. त्यांच्या या प्रयत्नामुळे संस्थानाचे उत्पन्न वाढल्याचे दिसून येते. सन १९०९–१० मध्य जमीन महसुलतपासून १,९०,५३२ रूपये उत्पन्न मिळत होते. त्यामध्ये सन १९३९–४० मध्ये २,०७,७०४ वाढल्याचे दिसून येते. [९] शेती हेउत्पन्नाचे हमखास साधन नव्हते. त्यासाठी उद्योगधंदयाना चालना दिली किर्लोस्कर बंधूना याच विचाराने त्यांनी बळ दिले. सन १९१० मध्ये किर्लोस्कर उदयोगास ३८ एकर जागा व १० हजार रूपयांचे भांडवल दिले. किर्लोस्करांच्या उद्योगामुळे हजारो लोकांना रोजगार मिळाला डिसेंबर १९४५ अखेर १४३९ कामगार तेथे काम करीत होते. ओगले काच कारखाना, औंध सोप वर्क्स, आदी उद्योगधंदयामुळे मोठया प्रमाणात बेरोजगारी दूर झाली. छोटया मोठया उद्योगसमुहात कामगारांची संख्या सुमारे ३२०० इतकी होती तसेच संस्थानाचे उत्पन्नही वाढल्याचे दिसून येते.

### राष्ट्रीय सांस्कृतिक जागरण :–

बाळासाहेब पंतप्रतिनिधी कलाप्रेमी होते. चित्रकला, साहित्य, शिल्पकला, संगीत, क्रिडा, नाटक क्षेत्रातील त्यांचे कार्यही भावी पिढीस प्रेरणा देणारे आहे. औंधमधील श्री भवानी चित्र व वस्तुसंग्रहालय पाहिल्यानंतर त्यांची प्रचिती येते. सन १९३५ मध्ये इंदुर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहीत्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. संस्थानाचे उत्पन्न अत्यल्प असतानाही त्यांनी पुणे येथील भांडारकर, प्राच्यविद्या संशोधन संस्थेला महाभारताची संशोधित मराठी आवृत्ती काढण्यासाठी एक लाख रूपयांची मदत केली. [१०] बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी स्वदेशीचा पुरस्कार मोठया प्रमाणात केला राज्याच्या विकासासाठी स्वदेशीचे तत्व सर्वांनी अंगिकारावे यासाठी स्वतः ते संस्थानातील निर्माण झालेल्या खादीच्या कपडयांचा पेहराव करीत असत. तसेच संस्थानातील शेतीत पिकलेल्या वस्तूच प्रामुख्याने आहारात घेत असत. ब्रिटीश सत्तेचे मांडलिक असूनही बाळासाहेबांनी औंध संस्थानात स्वातंत्र्य चळवळ व प्रतिसराकरबाबत मोठया प्रमाणात सकारात्मक भूमिका घेऊन स्वतः राष्ट्रीय कर्तव्य बजावलेच. मात्र जनतेलाही ते बजावण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रोत्साहन दिले.

आधुनिक काळातील लोकशाही शासनाची सर्वच मुल्ये, वा निकष त्यांनी राबविलेल्या लोकशाही प्रयोगात नसली तरी शंभर वर्षापूर्वी वासाहातीक कालखंडात तसेच सरंजामशाहीचे राजकीय संस्कार असणा–या घराण्यातला जन्म व सभोवतालची राजकीय, सामाजिक परिस्थितीही लोकशाहीला पूरक नसताना हा विचार मांडणे व कृतित आणणे अत्यंत महत्वाचे आहे. आजचे सत्ताप्राप्तीसाठीचे संघर्ष व त्यासाठी संपत्ती, हिंसा, दडपशाही, जातीयता,

अघोरी स्पर्धा आदी मार्गाचा सर्रास होणारा वापर पाहता बाळासाहेबांनी मांडलेला विचार निश्चितच आजच्या नेतृत्वाला, तरूणांना नवा आदर्श देणारा आहे.

### समारोप :–

राजकीय विकासाच्या निकषांचा विचार करता बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी केलेले कार्य राज्यशास्त्रीय दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचे आहे. ग्रामस्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव योजना, ग्रामसभा, लोकसहभागातून ग्रामोद्धार आदी आजच्या शासनाच्या धोरणांची बीजे औंध प्रतिमाणात दिसून येतात. त्यांनी राबविलेल्या अनेक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धोरणामुळे विकास झाला. औंध परिसरात शिक्षणविषयक जागृती झाली त्यांच्या सांस्कृतिक कामगिरीमुळे औंध संस्थान व आजच्या, सातारा–सांगली परिसरातील अनेक साहित्यिक चित्रकार, संगितकार निर्माण झाले. ग.दि.माडगूळकर त्यापैकी उत्तम उदाहरण देता येईल. त्यांच्या उद्योजकता प्रियतेमुळे किर्लोस्कर ग्रुप सारखे उद्योग वाढले परिसराचा औद्योगिक विकास झाला लोकांना घरापासून कमी अंतरावर रोजगार मिळू लागला. क्रिडा तथा सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे कार्य अतुलनीय आहे.

पारंपारिक अधिसत्ता मजबुत असताना स्वतःहून आधुनिक काळाशी जुळवून घेण्यासाठी लोकशाही अधिसत्तेकडे त्यांनी केलेला प्रवास राज्यशास्त्रीय दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचा आहे.

*संदर्भ*

१.इनामदार ना.र.(संपा.)ःआधुनिक राजकीय विश्लेषणः पळशीकर सुहास, 'राजकीय बदल आधुनिकी भवन आणि राजकीय विकास' शुभदा पब्लिकेशन्स, पुणे,-९ पृ.३२३-३२९
२.राज्यघटना कायदा-१९३९ संस्थान औंध
३.राज्यघटना कायदा १९३९, संस्थान औंध
४.राज्यघटना कायदा १९३९, संस्थान औंघ पृ.२
५.चापेकर ना.गो, 'लोकसत्ताक औंध', परिशिष्ट क्र. ७-८
६.पटवर्धन वि.अ., 'दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा', पृ.४-५
७.राज्यघटना कायदा, औंध पृ.२, रोदरमुंड इंदिरा, औंध एक्सप्रीमेंट', ओरीएन्ट-लॉन्गमन, मुंबई, १९८३, पृ-२३-२४
८.बाळासाहेब पंतप्रतिनिधी गौरवग्रंथ-पृ. १५०-१५३.
९.औंध संस्थान प्रशासन अहवाल-सन १९३९-४०, पृ.१४
१०.पंतअप्पा, मुलाखवेगळा राजा, मानसन्मान प्रकाशन, पुणे १९८६, पृ.१६

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org